# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३०–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. जयवंत दाजी नागणे,<br>मु. पो. कोकळे, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. जयवंत दाजी नागणे, मु. पो. कोकळे, ता. कवठे महांकाळ,जि. सांगली यांनी घर क्रमांक ५८१ मध्ये ०.४२ के.डब्ल्यू. घरगुती वीज पुरवठा मिळावा यासाठी दि. १२.५.२०१० रोजी वि.प.कडे अर्ज केला. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार त्यांना दि. ११.६.२०१० पर्यंत चलन मिळणे जरुरी होते. ते आजतागायत मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १३.५.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ५९९५ दि. १८.५.२०१० रोजी पारित केले.

अंतर्गत कक्षाने विलंब झाला असल्यास तक्रारदारास भरपाई देणे बाबत आदेश दिले आहेत. कक्षाच्या आदेशाविरुध्द तक्रारदाराने दि. १९.६.२०१० रोजी मंचामध्ये प्रस्तुत अपील नमुना अ मध्ये दाखल केले. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल करण्यात आली.

वितरण कंपनीने आपल्या दि. ९.७.२०१० च्या लेखी अहवालात श्री. जयवंत दाजी नागणे, रा. कोकळे यांचा घरगुती वीज पुरवठा मागणी अर्ज दि. १२.५.२०१० रोजी प्राप्त झाला असल्याचे मान्य केले व त्यांना दि. २९.५.२०१० रोजी पोहोच घेवून चलन देण्यात आलेले आहे. त्यांचे ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २७.७.२०१० ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.चे अधिकारी उपस्थित. श्री. खापरे यांनी चलन दिल्याबाबतचा पुरावा वि.प.ने द्यावा, चलन मिळालेले नाही असे प्रतिपादन केले. त्यामुळे विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मागणी केली. चलनाबाबतचा पुरावा दि. २८.७.२०१० ला हजर करणार आहे असे मंचासमोर वि.प.च्या अधिकाऱ्यांनी सांगितले. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. २८.७.२०१० ला चलनाची झेरॉक्स प्रत हजर केली. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होतो.

१) तक्रारदार यांस चलन देण्यास विलंब झाला आहे काय ?

उत्तर : होय

२) तक्रारदार भरपाई मिळण्यास पात्र आहे काय ?

उत्तर : आहे

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी नवीन घरगुती कनेक्शनसाठी दि. १२.५.२०१० रोजी अर्ज केल्याचे उभयबाजूंनी मान्य केले आहे.अंतर्गत कक्षाचे आदेश दि. १८.५.२०१० रोजी पारित झाले आहेत. प्रस्तुत तक्रार मंचामध्ये दि. १९.६.२०१० रोजी दाखल झाली आहे. सुनावणीच्यावेळी वि.प.ने चलनाची पोच प्रत देण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे चलना वरील तारखाची नोंद बारकाईने बघतांना दि. २९.५.२०१० नंतरच चलन दिले आहे असे दिसून येते. सदर चलनाची रक्कम भरण्याची मुदत दि. २८.६.२०१० ते ७.७.२०१० अशी नोंदविली आहे. सर्वसाधारणपणे ज्या तारखेस खर्चाचे चलन दिले तेथून ३० दिवसांची मुदत असते. त्यामुळे वि.प.च्या म्हणण्याप्रमाणे दि. २९.५.२०१० ला ग्राहकास चलन मिळाले आहे. तसेच चलन दि. २८.५.२०१० या तारखेचे गृहित धरल्यास मुदतीच्या तारखेमध्ये शंका निर्माण होत आहे. त्यामुळे सदरचा पुरावा ग्राह्य धरता येणार नाही. वि.प.ने मंचापुढे कागदपत्रे हजर करतांना सर्व शहानिशा करुनच योग्य कागदपत्रें पुरावा म्हणून दाखल करणे योग्य आहे. तसेच ग्राहक वा प्रतिनिधींनी मंचासमोर पुराव्याचे आवश्यक योग्य कागद दाखल करणे आवश्यक आहे. वि.प.च्या लेखी अहवालात दि. २९.५.२०१० रोजी पोहोच घेवून चलन देण्यात आले आहे व त्याची प्रत तक्रारदार यांस अग्रेषित केलेली आहे. अशा परिस्थितीत तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी मंचासमोर चलन दिल्याबाबतचा पुरावा हजर करण्याचा आग्रह धरण्याऐवजी तक्रारदार यांजकडून वि.प.तर्फे चलन मिळाले आहे काय याची खातरजमा केली असती तर बरे झाले असते असे वाटते. त्यामुळे कदाचित तक्रारीची सुनावणी घेण्याची वेळ आली नसती. असो. वि.प.तर्फे चलनाची झेरॉक्स प्रत हजर केली आहे त्यावर तक्रारदाराचा अंगठा बांधला आहे व तो दस्तूर केला आहे.

तथापी मुदती नंतरच चलन दिले आहे. हि बाब स्पष्ट होत आहे, त्यामुळे या दोन्ही मुद्दयांचे उत्तर होकारार्थी देवून दि. ११.६.२०१० ते २८.६.२०१० या कालावधीसाठी ३ आठवडे x १०० = रु.३००/– भरपाई देणे कायदेशीर होईल असे मंचाचे मत झाले आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) चलन देण्यास झालेल्या दि. ११.६.२०१० ते २८.६.२०१० या ३ आठवड्यांच्या विलंबापोटी रु.१००/– प्रति आठवडा या प्रमाणे रु.३००/– भरपाई द्यावी असा मंच आदेश देत आहे.

२) सदर रकमेचे बिलात समायोजन करण्यात यावे.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष